# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ डिसेंबर, २०१६ रोजी आयोजित तृतीय सभेचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची तृतीय बैठक सोमवार दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे अध्यक्षतेखाली "वनभवन" रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत कार्यकारी समितीचे सदस्यांची व निमंत्रित अधिका-यांची यादी सोबत जोडली आहे. (परिशिष्ट-१)

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य सचिव यांनी तृतीय बैठकीच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष व इतर उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. मंडळाचे आतापर्यंत केलेल्या प्रगती बाबत अवगत करुन दिले व बैठकीत ठेवण्यात आलेल्या विषयांबाबत सादरीकरण केले. त्यानंतर विषयसूचीप्रमाणे मुददेनिहाय चर्चा झाली. बैठकीत देण्यात आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १ :- दिनांक २०.०८.२०१६ रोजी टकले सभागृह, वनभवन, नागपूर येथे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक २०.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-मुले/मनिपमं/यो/प्र.क्र.निपप्र/१२५/१६-१७, दिनांक ०२.०९.२०१६ अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यता आलेला असून, सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्याकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणा करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात यावे अशी सदस्य सचिव यांनी मंडळास विनंती केली. त्यानुसार कार्यवृत्तांत कायम करण्यात आले.

**विषय क्रमांक २ :- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीच्या दिनांक २०.०८.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या निर्णयावर झालेली कार्यवाही.**

याबाबतची माहिती मंडळाचे समितीसमोर ठेवण्यात आले व दिनांक २०.०८.२०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती तृतीय बैठकीच्या विषय सुची समवेत परिशिष्ट-२ म्हणून जोडण्यात आली असल्याचे सर्व सन्माननीय सदस्यांचे निदर्शनास आणून दिले व त्यास समितीने मान्यता प्रदान केली व कार्यवाही न झालेल्या मुददांवर लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करावी असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ३ :- मंडळाचे मानचिन्हाला मान्यता देणे.**

मंडळास एक Designer / यंत्रणांकडून एकूण ६ मानचिन्हे प्राप्त झाले व त्यावर सभेत विस्तृत चर्चा करण्यात आली परंतू सभेसमोर ठेवण्यात आलेल्या मागील सभेतील मानचिन्ह व नव्याने प्राप्त मानचिन्हांपैकी एकही मानचिन्ह सदस्यांना योग्य वाटले नाही. नंतर परत एकदा सर्व मान्हचिन्ह सदस्यांचे निदर्शनास आणुन देण्यात आले. त्यानुसार नव्याने ठेवण्यात आलेल्या मानचिन्हांपैकी METB असे लिहिलेल्या मानचिन्हाची अंतिमतः निवड करुन त्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या अटीवर समितीने मान्यता दिलेली आहे.

**विषय क्रमांक ४ :- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे संकेतस्थळाच्या प्रारुपाला मंजुरी घेणे.**

सदर सभेत मंडळाच्या नवीन संकेतस्थळाचे प्रारुप www.mahaecotourismboard.com तयार करुन मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. त्यामध्ये राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प व अभयारण्य, एम टी डी सी, एफ डी सी एम विभागांच्या तसेच राज्यातील सर्व विभागांचे विश्रामगृह, रिसोर्टस व खाजगी टुर्स ऑपरेटर मालकांचे रिसोर्ट, विश्रामगृह, होम स्टे, ट्रव्हल संघटना तसेच राज्यातील असंरक्षित क्षेत्रात असलेले खाजगी मालकांच्या मालकीचे निसर्ग पर्यटन स्थळे, रिसोर्टस इत्यादींच्या वेबसाईटस लिंक मंडळाच्या संकेतस्थळाला जोडण्याच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी दिल्यात. तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी कळविले की, राज्यातील जेवढे काही खाजगी टुर्स ऑपरेटर, NGO's / रिसोर्टस आहेत त्यांची माहिती / यादी एकाच लिंक मध्ये जोडण्यात यावे जेणेकरुन एखादया पर्यटकाला टुर्सची माहिती पाहिजे असल्यास आणी तो मंडळाच्या संकेतस्थळावर गेल्यास त्यांनी टुर्स ऑपरेटर असे त्यावर नोंदविल्यास लगेच कुठलीही माहिती मिळू शकेल.

मध्यप्रदेश राज्यात वन विभागच्या अधिकारक्षेत्रातील सर्व व्याघ्र प्रकल्प व अभयारण्याचे राज्यस्तरीय व्याघ्र प्रतिष्ठाणांची संकेतस्थळे मध्यप्रदेश निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या संकेतस्थळाशी जोडण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील सर्व व्याघ्र प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेले व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठाण सुध्दा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे संकेतस्थळाशी जोडण्याचे निर्देश प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी दिलेत.

मंडळाचे संकेतस्थळाचे प्रारुपामध्ये CONTACT US ची जी लिंक देण्यात आलेली आहे त्यामध्ये FEEDBACK ची लिंक देण्यात यावी जेणेकरुन मंडळाचे संकेतस्थळाला भेट देण्या-या नागरिक / पर्यटकांना मंडळाचे संकेतस्थळाबददल प्रतिक्रिया नोंदविण्याची व्यवस्था करण्याची सूचना प्रो. निशीकांत मुखर्जी यांनी दिली.

अशा प्रकारच्या काही सुधारणा करण्याच्या अटीवर समितीने मान्यता दिलेली आहे.

**विषय क्रमांक ५ :- सन २०१६-१७ वर्षात आयोजित करण्यात येणा-या प्रादेशिक व वन्यजीव क्षेत्रातील निसर्ग पर्यटन मार्गदर्शक प्रशिक्षणाच्या वार्षिक आराखडयास मान्यता देणे.**

वर्ष २०१६-१७ मध्ये ३ मार्गदर्शक प्रशिक्षण प्रस्तावित करण्यात आले होते त्यापैकी एक प्रशिक्षण पेंच व्याघ्र प्रकल्पातील नागलवाडी वनपरिक्षेत्र येथे पूर्ण करण्यात आले असून त्यात पेंच, मेळघाट, ताडोबा व बोर व्याघ्र प्रकल्पातील ४५ गाईड ना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. उक्त प्रशिक्षण बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, पेंच व्याघ्र प्रकल्प व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ नागपूर यांचे संयुक्त विदयमाने आयोजित करण्यात आले होते.

पर्यटकांना अभयारण्य वा व्याघ्र प्रकल्प तसेच राष्ट्रीय उदयानाबाबत व तेथील प्रशासनाने घालुन दिलेल्या नियमांची माहितीचा अभाव, तेथे अस्तित्वात असलेल्या वन्यप्राणी, पक्षी व इतर प्राण्यांबददल माहिती नसणे, उदयानात वाहनांना प्रवेश देतांना प्रत्येक वाहनाला मागे कचराकुंडी असणे गरजेचे आहे जेणेकरुन पर्यटक उदयानात घेऊन गेले साहित्य वा कचरा त्या कचराकुंडीत टाकणार त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाणार आहे. या करीता राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प व अभयारण्यातंर्गत येणा-या गाईड याबाबत संबंधित क्षेत्र संचालक तथा मुख्य वनसंरक्षक यांनी सूचना देणे आवश्यक आहे. वरिष्ठ अधिका-यांनी राज्यातील व्याघ्र प्रकल्प वा अभयारण्यास भेट दिली असता बरेचशे गाईड यांना सदर अधिकारी कोण आहे याबाबत माहिती नसते तरी

त्याबाबत त्यांना माहिती देण्यात यावी, तसेच गाईड ला राज्यभरात एकाच प्रकारचा गणवेश असावा अशा सूचना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर यांनी दिल्यात व त्यास समितीने सहमती देण्याच्या अटीवर मान्यता दिलेली आहे. गाईड करीता गणवेशची निश्चिती करुन सदर गणवेश संपूर्ण राज्यात वापरली जाईल याबाबत कार्यवाही करण्यास समितीने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांना प्राधिकृत केले.

**विषय क्रमांक ६ :- कॉफी टेबल बुक चे हस्तलिखीत प्रत ला मान्यता देणे.**

महाराष्ट्रातील निसर्ग पर्यटन बाबत माहिती देण्याकरीता विदर्भातील व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्रे व इतर निसर्ग पर्यटन क्षेत्राबाबत पुस्तिकेचा प्रारुप मसूदा सभेसमोर सादर करण्यात आला असून त्यास समितीने काही सुधारणा करण्याच्या अटीवर मान्यता दिलेली आहे. तसेच विदर्भातील पुस्तिका तयार करतांना राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नागपूर सुधार प्रन्यास च्या क्षेत्रात येत असलेल्या पर्यटन स्थळांचा देखील त्यांचे सहकार्याने उक्त कॉफी टेबल बुक मध्ये समावेश करावा असे निर्देश प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी दिलेत.

**विषय क्रमांक ७ :- Development of cadre of naturalists in protected areas.**

राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प व अभयारण्य तसेच वनेत्तर क्षेत्रात प्रत्येकी ३ ते ४ नॅचरॉलिस्ट नियुक्त करणेबाबत सभेमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. उक्त विषयाबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी सांगितले की, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणारे रिसोर्ट मालक श्री. आदित्य धनवटे यांनी त्यांचे रिसोर्ट चे माध्यमातून ताडोबा व आजुबाजुच्या परिसरात वावरणारे वन्यजीव, पशु पक्षी व वनस्पतींची माहिती देण्याकरीता स्वतःचे नॅचरॉलिस्ट नियुक्त केलेले आहे. त्याच धर्तीवर राज्यातील व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक / संचालक व मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे क्षेत्रामध्ये असलेले रिसोर्ट मालक व NGO's यांचेशी संपर्क करुन त्यांचे माध्यमातून नॅचरॉलिस्ट ची नियुक्ती करता येईल असे सुचविले.

राज्यातील व्याघ्र प्रकल्प / अभयारण्यांतर्गत कार्यरत असलेले बहुतांश गाईड / मार्गदर्शक हे तेथील स्थानिक रहिवासी असल्याने त्यांनी त्या परिसरातील परिस्थितीची इत्यंभूत माहिती असते. जे गाईड Graduate, Post Graduate वा त्या पेक्षा उच्च शिक्षण घेतलेले आहे अशा गाईड ला त्यांच्या शिक्षणानुसार किंवा त्यांचेमधील कौशल्याचे निकषावर असलेल्या गाईडला नॅचरॉलिस्ट म्हणून विभागाद्वारे अधिकृत नोंदणी करता येईल अशी सूचना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) म.रा.नागपूर यांनी केली. राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प व अभयारण्य तसेच वनेत्तर क्षेत्रात प्रत्येकी ३ ते ४ नॅचरॉलिस्ट यांची नेमणूक नोंदणी अधिकृत नॅचरॉलिस्ट म्हणून करण्याच्या अटीवर समितीने मान्यता दिली.

**विषय क्रमांक ८ :- व्हिजन डॉक्युमेंट तयार करणे.**

मंडळाचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करणेसाठी अभ्यास गट नियुक्त करणेबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), नागपूर यांचे अध्यक्षतेखालील ४ सदस्यीय समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. उक्त समितीस व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याच्या अटीवर समितीने मान्यता दिलेली आहे.

**विषय क्रमांक ९ :- Approval for top ecotourism sites development and publicity programme.**

महाराष्ट्रातील निसर्ग पर्यटन क्षेत्राचा विकास होण्याकरीता १० निसर्ग पर्यटन क्षेत्राचा सविस्तर विकास आराखडा तयार करणेस व त्याकरीता शासनाचे मंजूरीने Consultant गटाची नियुक्ती करण्यात येईल व त्यांचेकडे विकास आराखडयाचे मार्गदर्शक तत्वे व कार्ये तसेच संकल्पना टिप्पणी तयार करुन त्याची प्रसिध्दी वन विभागाचे प्रसिध्दी विभागाकडून करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. यापूर्वी मा. सचिव (वने) यांचेसोबत झालेल्या चर्चेमध्ये पर्यटन विकास आराखडा तयार करणेकरीता Consultant ची नांवे शासनास पाठविणेबाबत कळविले होते. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या अटीवर समितीने मान्यता दिलेली आहे.

**विषय क्रमांक १० :- Approval for packages of Circuit Tourism**

Circuit Tourism नागपूर, मेळघाट-अमरावती व पुणे येथे सुरु करणेबाबत प्रस्तावित करणेबाबत गठीत समितीस कार्यकारी समितीने मान्यता दिलेली आहे. Circuit Tourism संजय गांधी राष्ट्रीय उदयान व मुंबई कडील भागात सुरु करण्याच्या सुध्दा सूचना समितीने दिल्यात व उक्त पॅकेज खाजगी टुर्स ऑपरेटर यांचे सहकार्याने राबविण्यात यावे. तसेच आवश्यकता पडल्यास मध्यप्रदेश पर्यटन विकास महामंडळाची मदत घेण्याच्या सूचना देखील दिल्यात. प्रो. निशीकांत मुखर्जी यांनी मराठवाडयातील अजिंठा वेरुळ लेण्या, देवगिरी किल्ला, उल्कापातामुळे तयार झालेले लोणार सरोवर व सिंदखेडराजा तसेच विदर्भातील बोर व्याघ्र प्रकल्प, आचार्य विनोबा भावे यांचा आश्रम तसेच वर्धा सेवाग्राम येथील महात्मा गांधींच्या वास्तव्याने पुनीत वा वास्तव्य केलेली बापु कुटी असा एक पॅकेज तयार करण्यात यावे असे सुचविले. सर्किट टूरीझम बाबत अभयास करुन मार्गदर्शक सूचना काढणे व त्या करिता रोड नकाशा तयार करण्याकरीता ४ सदस्यीय समितीला कार्यकारी समितीने मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक ११ :- Approval for uniform pattern of signages.**

राज्यातील व्याघ्र प्रकल्प, अभयारण्य व संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वनेत्तर क्षेत्रातील निसर्ग पर्यटन क्षेत्रात एकाच प्रकारचे माहिती फलक असणेबाबत समितीसमोर माहिती फलकांचे नमुने मंजुरीस्तव सादर करण्यात आले होते. त्यापैकी (१) संरक्षित क्षेत्रातील मुख्य प्रवेशद्वाराजवळ सर्वसाधारण माहिती देणारे फलक व (२) प्रमुख मार्गावर दिशादर्शक फलक (३) पर्यटक भेट देत असलेल्या स्थळांना माहिती देणारे फलक यांचा समावेश आहे. मंजूरी देण्यात आलेली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उदयानामध्ये पर्यावरण शिक्षण संस्था (Centre for Environmental Education (CEE)) अहमदाबाद, गुजरात व स्वयंसेवी संस्था Conservation Action Trust (CAT) या संस्थेचे सहाकार्याने माहिती फलक लावण्याबाबत एक सांमजस्य करार केलेला असुन त्या ठिकाणी एकाच प्रकारचे उत्तम असे माहिती फलक लावण्यात आलेले आहे. त्याचबरोबर जम्मु व कश्मिर राज्यात अस्तित्वात असलेल्या Hemis National Park मध्ये एकाच प्रकारचे माहिती फलक सर्वत्र लावण्यात आल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी सभेत सांगितले. त्याच धर्तीवर राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प, अभयारण्य व संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वनेत्तर क्षेत्रात पर्यावरण शिक्षण संस्था (Centre for Environmental Education (CEE)) अहमदाबाद, गुजरात यांचे सहकार्याने त्यांचेशी सांमजस्य करार करुन माहिती फलक लावण्याबाबत कार्यवाही करणे योग्य राहील याबाबत कार्यवाही करण्यास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांना सूचना केली व त्यास समितीने मान्यता दिली.

**विषय क्रमांक १२ :- Approval for study tour to neighboring states to study good practices of ecotourism adopted in these states.**

ज्या राज्यात निसर्ग पर्यटनाचे उत्कृष्ट कामे करण्यात येत आहेत अशा राज्यात करण्यात येत असलेल्या कामांबाबत अभ्यास करणेसाठी दोन अधिका-यांचा अभ्यास गट तयार करणे बाबत प्रस्तावित करण्यात आले होते. सदर अभ्यास गटात कार्यकारी समितीचे सदस्य व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांचे कार्यालयातील अधिकारी व मंडळाचे अधिकारी यांना पाठविणेबाबत च्या अटीवर प्रस्तावास समितीने मान्यता दिली आहे. व्यवस्थाकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांना सदर अभ्यास गट नियुक्त करणे व त्यासंदर्भातील जबाबदारी त्यांनी स्वतः सांभाळावी असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी निर्देशित केले.

**विषय क्रमांक १३ :- Appointment of panel of Architects & Consultants**

कार्यकारी समितीने Architects & Consultants ची नियुक्ती करणेबाबत मंजूरी देणेस्तव प्रस्तावित केले होते. निसर्ग पर्यटन योजन राबविण्याकरिता Architect Consultant पॅनेलवरील Architect Consultant यांची स्पर्धात्मक निविदांचे धर्तीवर नेमणूक करण्याचे संपूर्ण अधिकारी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / क्षेत्र संचालक आणि वनसंरक्षक यांना प्रदान करण्यास शासन पत्र क्र. डब्ल्युएलपी-०६१५/प्र.क्र.२१६/फ-१, दिनांक ५.८.२०१५ अन्वये शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शासकीय महामंडळे, महानगरपालिका तसेच नागपूर सुधार प्रान्यास यांचेकडे स्वतःचे Panel उपलब्ध असून त्याची सेवा निसर्ग पर्यटन कामाकरीता वापरण्यासाठी त्यांचे अस्तित्वात असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून Architects & Consultants ची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्यात. तसेच मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व / क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प सर्व आणि वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव) सर्व यांना त्यांचे क्षेत्रात असलेल्या निसर्ग पर्यटन केंद्रांवर स्पर्धात्मक निविदांचे धर्तीवर Architects & Consultants ची नियुक्ती करणेस तसेच निविदा e-tender चे माध्यमातून करण्यात यावे असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) म.रा.नागपूर यांनी सूचित केले व त्यास समितीने मान्यता प्रदान केली.

**विषय क्रमांक १४ :- मंडळाचे कार्यालयीन काम जसे पर्यटन स्थळाचे नियोजन व व्यवस्थापन / निसर्ग शिक्षण / विपणन व प्रसिध्दी, सिस्टीम ऑपरेटर करणेकरीता प्रत्येकी एक व्यवस्थापक नियुक्ती करणेस मान्यता देणे.**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ८.१२.२०१५ अन्वये करण्यात आली असुन मंडळाचे कार्यालयाकरीता व्यवस्थापक (नियोजन व व्यवस्थापन) / विपणन व प्रसिध्दी / निसर्ग शिक्षण असे प्रत्येकी एक (विभागीय वन अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी) बाहय स्त्रोताद्वारे नियुक्ती करण्याचे प्रस्तावास समितीने मान्यता दिली व वरील पदे लवकरात लवकर भरण्यात यावे जेणेकरुन मंडळाचे कामास गती मिळेल असे देखील सूचित केले.

**विषय क्रमांक १५ :- निसर्ग पर्यटन अंतर्गत कार्यक्रम / सुधारणांची अंमलबजावणी करीता प्राप्त होणार निधी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा.नागपूर यांचेकडून मंडळाचे खात्यात प्राप्त होणे व मंडळामार्फत संबंधितांना वितरित होणेबाबतच्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

याबाबत शासनास प्रस्ताव सादर करुन शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करण्याबाबत सुचना केली.

**विषय क्रमांक १६ :- दिनांक २०.०८.२०१६ रोजीचे सभेत चर्चा न झालेल्या निसर्ग पर्यटन स्थळांचे विकास आराखडयांना मंजूरी देणे.**

निसर्ग पर्यटन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी मंडळाची स्थापना करण्यात आली त्यामुळे मंडळाचे स्थापनेनंतर या कार्यक्रमांमध्ये गुणात्मक दृष्य परिणाम साध्य करणेसाठी आराखडयाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. मागील सभेमधील मुददा क्र.३.२, ३.१० व ३.१२ मध्ये प्रस्तावाचे सादरीकरण करण्याकरीता संबंधित अधिकारी उपस्थित झाले नसल्याने उक्त मुददे पुढील सभेमध्ये ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार उक्त मुददांबाबत संबंधितांनी त्यांचे क्षेत्रामध्ये निवडण्यात आलेल्या स्थळांचे प्रकल्प आराखडयाचे सादरीकरण केले.

| अ.क्र. | प्रकल्प आराखडयाचे नांव | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| १६.१ | भोरगिरी अंतर्गत भोरगड किल्ला - मुवसं (वजी) पुणे | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी त्यांचे पत्र दि.६.४.२०१६ अन्वये सन २०१५-१६ ते २०१८-१९ अशा तीन वर्षाचा आराखडा सादर केलेला आहे. आराखडयाची एकूण रक्कम रु.३६६.३३ लक्ष आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>भोरगिरी हे गांव भिमाशंकर अभयारण्यात येत असून गावालगत भगवान शंकराचे बारा ज्योतिर्लिगांपैकी एक ज्योतिर्लींग व लक्ष्मीचे मंदीर आहे. हिंदु धर्मीय भावीक भक्त या स्थळाला मोठया प्रमाणावर भेट देत असतात. त्याला लागुनच भोरगड हा ऐतिहासिक किल्ला असल्याने पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने योग्य असून या क्षेत्रात भीमा नदी, भोरगड केव तसेच विविध प्रकारच्या नैसर्गिक वनस्पती आहेत. उक्त पर्यटन स्थळ झाल्यास त्याच्या आजुबाजूच्या गावक-यांच्या राहणीमानात सुधारणा होऊन त्यांना आर्थिक लाभहोईल व त्यांचे जीवनमान वृध्दीगंत होण्यास मदत होईल. भोरगिरी ते कोथरुन रस्ता दुरुस्ती, निसर्ग पायवाट, हिरवे बेचेंस, पॅगोडा, जैवविविधता उदयान, सोलर लाईट, प्रसाधन गृह बांधकाम, प्रसिध्दी व माहिती फलक, कोटेश्वर मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण, ॲम्पीथीएटर बांधणे, VEDC/SHGs/Volunteer Village Youth Groups | सदर स्थळाचे परीरक्षण संयुक्त वनव्यवस्थापन समिती भोरगिरी मार्फत करण्यात यावे अश्या सुचनासह आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांना प्रशिक्षण देणे इत्यादी कामे प्रस्तावित आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, भोरगिरी मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे.<br>वेहेलोळी येथे VEDC मार्फत निवासी संकुल उपलब्ध करुन दिलेले असून त्याच ठिकाणी होम स्टे तसेच रेहेकुरी येथे तंबु निवास बांधण्यात आलेले आहे त्याच धर्तीवर भोरगड किल्लावर सुध्दा तंबु निवास सुध्दा उपलब्ध करुन देणेस विनंती केलेली आहे. उक्त ठिकाणी VEDC कार्यरत आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर यांनी सूचित केले की, Nature Adventure and Religious व होम स्टे मध्ये १०० टक्के सबसीडी मागण्यात येते परंतू ते देणे शक्य नाही. राज्य योजना अंतर्गत वन पर्यटनाकरीता आदिवासी विभागाकडे<br>१०० टक्के निधी चा प्रस्ताव पाठववा व त्यात DCPS मधुन जिल्हाधिकारी यांचे मार्फत निधी असल्यास उपलब्ध करुन घेता येईल. | |
| १६.२ | शहापूर वन विभाग वनक्षेत्र शहापूर, निसर्ग पर्यटन केंद्र वाफा - मुवसं (प्रा) पुणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक १४.०६.२०१६ अन्व्ये सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षाकरीता रु.४८.५९ लक्ष चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. निसर्ग पर्यटन केंद्र वाफा हे शहापूर, जि. ठाणे जवळील १.५ किमी अंतरावर १२ हेक्टर क्षेत्रात स्थापन केलेल आहे. रोपवाटीकेस ३ हेक्टर क्षेत्र पुरेसे असून उर्वरित क्षेत्रात सन २००८-०९ मध्ये निसर्ग पर्यटन स्थळ विकसीत करण्यात आलेले आहे. वनसंरक्षण समिती भागदळ मार्फत पर्यटन केन्द्राचे देखभालीचे काम करण्यात येणार आहे.<br>सद्यस्थितीत विश्रामगृह, डॉरमेटरी पायडल नौका विहार, जेटस्की इंजीन बोटी, कृत्रिम धबधबा व बालोद्यान आहे. सन २०१६-१७ या वर्षात बटर फ्लाय गार्डन, सोलर लाईट, प्रसाधन गृह, बसण्यासाठी बाके, खेळणी इ. प्रस्तावित आहेत. भागदळ या वनसमितीला सन २०14 मध्ये रु.१६.०० लक्ष पेक्षा जास्त उत्पन्न मिळालेले आहे व त्यातून २० ते २५ स्थानिक गावकऱ्यांना रोजगार प्राप्त झालेला आहे. त्यात वाढ करण्याची सूचना समितीने केली. उक्त निसर्ग पर्यटन स्थळाला सन २०१५-१६ मध्ये १५ हजार पर्यटकांनी भेट दिलेली असून रु.१६.०० लक्ष उत्पादन मिळालेले आहे. त्यापैकी नियोजन व इतर खर्च रु.१३.०० लक्ष इतका असून निव्वळ नफा रु.३.०० लक्ष झालेला असल्याचे संबंधितांनी सादरीकरणाद्वारे सांगितले. | सन २०१५-१६ मध्ये उक्त समितीला प्राप्त झालेल्या महसूलाच्या तुलनेत चालू वर्षात पर्यटक संख्या व उत्पादन वाढविण्याच्या तसेच पर्यटन स्थळ विकसित करतांना वन संवर्धन अधिनियम, १९२७ चा भंग होणार नाही या अटीवर समितीने प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वन व्यवस्थापन समितीमार्फत आधुनिक साधनसामुग्रीचा वापर करुन पर्यटकांना उपयुक्त अशा सोयी सुविधा प्राप्त उत्पादनातून उपलब्ध करुन दयाव्यात तसेच उक्त समितीस प्राप्त निधीच्या १० टक्के रक्कम दरवर्षी सदर पर्यटन स्थळ विकसित करणेच्या कामात गुंतवणूक करण्यात यावी. तसेच मागणी करण्यात आलेली रक्कमेस समितीने मान्यता दिलेली आहे परंतू शासनाकडे छोटया छोटया निधीची मागणी करण्यात येवू नये अशा देखील सूचना समितीने केल्यात. | |
| १६.३ | मौजा येलदरी निसर्ग पर्यटन केंद्र, औरंगाबाद - मुवसं (प्रा) औरंगाबाद | मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद यांनी रु.५५९.१५ लक्ष चा आराखडा / प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. हिंगोली जिल्हयात येलदरी गावाजवळील पूर्णा नदीवर येलदरी धरण आहे. त्याचे जवळ पाणीसाठयाला लागून असलेल्या वनक्षेत्रात ३४ हे. क्षेत्रात निसर्ग पर्यटन केन्द्र विकसित करण्यात येणार असून उक्त केंद्राला लागुनच येलदरी विज प्रकल्प असल्याने शाळकरी विदयार्थी, पर्यटक व इतर भेट देत असतात.सदर योजना येलदरी वन व्यवस्थापन समितीचे माध्यमातून राबविण्यात येणार आहे.<br>सदर आराखडयात पर्यावरण पूरक व्यवस्था, वन व वन्यप्राणी विषयक माहिती प्रसिध्दी व माहिती पत्रके, निसर्ग पायवाट, निरीक्षण कुटया, प्रसाधन गृहे, पार्किंग व्यवस्था, निरीक्षण मनोरा प्रस्तावीत आहे. | सदर पर्यटन पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता आवश्यक असलेला निधी DPDC कडून उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| १६.४ | **नवीन निसर्ग पर्यटन स्थळांचे प्रकल्प आराखडयांना मान्यता देणे** | | |
| १६.४.१ | रेणुका माता मंदिर अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड - मुवसं (प्रा) औरंगाबाद | मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद यांनी श्री क्षेत्र रेणुकादेवी व मुकुंदराज या क्षेत्राचा एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून विकास व्हावा या करिता या परिसरात सन २०१५-१६ या कालावधीत राज्य योजनेतंर्गत रु.८२.६४ लक्षची कामे करण्यात आलीत. सन २०१६-१७ करीता रू३९.९७ लक्ष खर्चाचा आराखडा सादर करण्यात आला आहे.<br>रेणुका माता मंदिर अंबाजोगाई हे पर्यटनस्थळ बीड जिल्हयातील अंबाजोगाई तालुक्यामध्ये आहे. अंबाजोगाई तालुक्यात एकूण वनक्षेत्राची जमीन ३४६० हे. एवढी आहे. अंबाजोगाई येथे योगेश्वरी देवीचे मंदीर तसेच आदय कवि मुकुंदराज यांची संजीवन समाधी असून पूर्ण महाराष्ट्रात हे प्रसिध्द आहे. या दोन्ही मंदीराच्या बाजु लगत असे रेणुका देवी माता यांचे जागृत देवस्थान आहे. अंबाजोगाई शहराच्या उत्तरेस अवघ्या १ किमी अंतरावर वन विभागच्या अखत्यारित | प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेल्या डोंगरावर व शहरातून जाणा-या जयवंती नदीच्या तिरावर वसलेले आहे.<br>त्यामध्ये वनकुटी, वन उदयानासाठी समोरील बाजुस चेनलिंग फेन्सींग, वनउदयानसाठी मंदिराकडील संरक्षक रिलींग, संरक्षक भिंतींची उंची वाढविणे, झाडांना ओटे करणे, सिमेंट प्लग, गेटच्या उजव्या बाजूस संरक्षक भिंतींची लांबी वाढविणे, मंदिराच्या पाठीमागील दक्षिण बाजूस संरक्षक रिलींग, खेळणीच्या बाजुस लेव्हलींगसाठी आधारभिंत, मंदिराच्या पाठीमागील उत्तर बाजुस संरक्षक रिलींग, योगासन ओटे, पुष्पक उदयानाच्या बाजुस आधारभिंत, निरीक्षण मनोरा, जुनी संरक्षक भिंत दुरुस्ती व रंगकाम, जलशोषक चर इत्यादी कामे प्रस्तावित आहेत.<br>जल शोषक चर राज्य योजनेमध्ये न दाखविता दुस-या योजनेतून जल शोषक चर संबंधी निधीची मागणी करण्यात यावी असे समितीने सूचविले. | |
| १६.४.२ | गुलशन महल जैविक विविधता उदयान, औरंगाबाद - मुवसं (प्रा) औरंगाबाद | मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद यांनी निसर्ग पर्यटन (२४०६-२२९५) या राज्य योजनेतंर्गत वनपरिक्षेत्र औरंगाबाद मधील गुलशन महल जैवविविधता उदयान करीता रु.१८०.४४ लक्ष चा सुधारित आराखडा व सन २०१६-१७ करीता रु.१५९.१० लक्षचा नवीन बाब प्रस्ताव व आराखडा या कार्यालयास सादर केलेला आहे.<br>औरंगाबाद शहरातील आणि परिसरातील उल्लेखनीय पर्यटनस्थळांमुळे औरंगाबाद जिल्हयाला शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले आहे. हे शहर खाम नावाच्या लहानशा नदीकाठी वसलेले असून उत्तर आणि दक्षिणेस टेकडयांच्या रांगा आहेत. इतिहासात निजामाचा राजवाडा असलेल्या गुलशन महल इमारत समूहात आजघडीस विभागीय आयुक्तांचे कार्यालय आणि निवासस्थान यांचा समावेश आहे. गुलशन महल उदयान सुमारे ४ एकर क्षेत्रावर दोन पातळयांवर विभागलेले आहे. उदयानात दोन्ही पातळयांत पाणी खुल्या उघडया जलवाहिन्यांतून वाहते ठेवण्याची पुरातन व्यवस्था आहे. या जलवाहिन्यांना उतारावर दगडी चादर दिलेल्या आहेत. त्यावरुन पाण्याचा प्रवाह उसळत आणि खळाळत वाहत राहिल अशी व्यवस्था आहे.<br>गुलशन महल हे राज्यकर्त्या निजामाचे निवासस्थान म्हणून राजकीयदृष्या अत्यंत महत्वाचे स्मारक आहे. परंतू हळूहळू त्यांचे सौदर्य खालावत | सदर पर्यटन पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता आवश्यक असलेला निधी DPDC कडून उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चालले आहे. या उदयानात विविध प्रजातींचे वृक्ष लावले आहेत परंतू उदयानाच्या देखभालीकडे दीर्घकाळ दूर्लक्ष झाल्याने अनावश्यक तण दाटले असून उदयानातील जुनी बांधकामे मोडकळीस आलेले असून त्यांचे जतन करणे आवश्यक आहे. हा परिसर आणि उदयान पुनरुज्जीवन करण्याची आणी वन विभागातर्फे निसर्ग शिक्षणाचे केंद्र उभारण्यासाठी एक संधी वन विभागाला याद्वारे प्राप्त झाली आहे. ही जागा शहरात अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून येथे जैविक विविधतावर्धक कामे केल्यास आणि त्याचबरोबर येथील व्यवस्थेची निगा राखल्यास निसर्गप्रेमी नागरिकांना निसर्ग भ्रमाणासाठी शहरातच एक ठिकाण उपलब्ध होईल.<br>सदर आराखडयात उदयानातील जागेची सफाई, जुनी अनावश्यक बांधकामे काढणे, विटांचे बांधकाम करणे, स्ट्रक्चरल रिपेअर्स व किरकोळ कामे, वॉटर चॅनल्सचे वॉटर प्रुफींग आणि दुरुस्ती करणे, लाईम मॉर्टरने चादरची दुरुस्ती करणे, वॉटर चॅनल्सची फरशी बसविणे, निसर्ग पायवाटा तयार करणे, चैनलिंक फेन्सींग उभारणे, दगडी विहिरींची दुरुस्ती करणे, नहरींचे पुनरुज्जीवन व दुरुस्ती, टेस्टींग चार्जेस, वृक्ष वेली झुडपे यांची लागवड करणे, संदेश फलक शिल्पाकृती, बेचेंस, कचरापेटी इत्यादी कामे करण्याचे प्रस्तावित आहे.<br>निसर्ग पर्यटनाचा मूळ उददेश हा वन क्षेत्रातील निसर्ग पर्यटन चा विकास करणे हा आहे. उक्त पर्यटन स्थळाची जागा ही NON FOREST AREA अंतर्गत येते. तसेच सदर पर्यटन स्थळ विकासित करण्यासाठी उत्पन्नाचे साधन व पर्यटक संख्या किती असणार याबाबत चर्चा करण्यात आली. उक्त चर्चेदरम्यान असे समोर आले की, सदर पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता कोणतेही साधन प्रशासनाकडे नाही, त्या परिसरामध्ये विभागीय आयुकतांचे कार्यालय व राज्यकर्त्या निजामाचे निवासस्थान असल्यामुळे सदर जागेची निवड करण्यात आलेली आहे. | |
| १६.४.३ | मौजे वाल्हेरी वनक्षेत्र तळोदा मेवासी वन विभाग, तळोदा अंतर्गत वन पर्यटन विकास आराखडा - मुवसं | उपवनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा यांना सन २०१६-१७ या १ वर्षाकरिता निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास या राज्य योजनेतंर्गत आराखडा तयार केलेला असून रु.५६.४७ लक्ष चा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.<br>वाल्हेरी हे गांव नंदूरबार जिल्हयातील तळोदा तालुक्यात | प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | (प्रा) धुळे | आहे. वाल्हेरी गावाच्या पश्चिमेला वाल्हेरी नदी आहे. गावाच्या पश्चिमेला कुंडवे गावालगत पुरातन महादेव मंदिर व अस्तंभा देवस्थान आहे. गावाच्या उत्तरेस नदीवर वाल्हेरी देवीचे मंदीर असून बारामाही धबधबे आहेत. डोंगरात उंचावर पुरातन पिर बाब दर्गा आहे. वनाच्या परिसरातील वनस्पती वन्यप्राणी पशु, पक्षी यांच्या मुलस्थान विकासात सुधारणा करणे, वनाबददल स्थानिक व आजुबाजूच्या जनतेतन आवड निर्माण करणे, विदयार्थी, पर्यटक व अभ्यासक यांना निसर्ग प्रशिक्षण केंद्र उपलबध करुन देणे, वाल्हेरी संयुक्त व्यवस्थापन समितीला उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करुन देणे, युवकांना पर्यटनातून रोजगाराच्या संधी मिळवून देणे इत्यादी पर्यटन विकासाचे उददेश आहेत. सदर स्थळ वाल्हेरी संयुक्त वन विकास समितीचे माध्यमातून राबविण्यात येणार आहे.<br>सदर आराखडयात उडडानपूल तयार करणे, माहिती केंद्र / सभा मंडप, प्रवेशद्वार तयार करणे, जाळीचे कुपंन तयार करणे, पॅगोडा तयार करणे, बालउदयान व व्यायामासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे व बसविणे, वन्यप्राण्यांचे पुतळे खरेदी करुन बसविणे, सौर दिवे खरेदी करणे व बसविणे, शौचालय तयार करणे, पाटचारे तयार करणे, सौरपंप खरेदी करणे, दगडी बांध बांधणे, पडीक जमीनीवर वनीकरण करणे, वनपर्यटनांतर्गत उदयाने तयार करणे, देवी मंदिर परिसरात गॅबीयन भिंत बांधणे, नदीकाठावर संरक्षण भिंत बांधणे व इतर सुसंगत कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.<br>बालउदयान व व्यायामासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे व बसविणे, वन्यप्राण्यांचे पुतळे खरेदी करुन बसविणे, वनपर्यटनांतर्गत उदयाने तयार करणे, सौरपंप खरेदी करणे इत्यादी कामे सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविण्यात येणा-या वनीकरण च्या योजनेतुन निधीची मागणी करण्याची सूचना समितीने दिली. | |
| १६.४.४ | निसर्ग पर्यटन केंद्र आक्षी, वनक्षेत्र अलिबाग - मुवसं (प्रा) ठाणे | उपवनसंरक्षक, अलीबाग यांनी निसर्ग पर्यटन केंद्र आक्षी करीता सन २०१६-१७ साठी रु.१२५.७५ लक्षचा १ वर्षाचा आराखडा या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. उक्त स्थळास वर्षाला २ ते ३ लक्ष पर्यटक भेट देत असतात. वन पर्यटनाकरीता आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा व व्यवस्थापन स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत राबविणे | उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता मागणी करण्यात आलेला निधी DPDC करुन उपलब्ध करुन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रस्तावित असून त्यापासून प्राप्त होणारे उत्पन्न सर्वस्वी वनव्यवस्थापन समितीच्या बचत खात्यात जमा न करता संबंधित गावाच्या विकासासाठी प्रस्तावित करण्यात येणार आहे. रायगड जिल्हयातील अलीबाग तालुक्यातंर्गत अलीबाग वन विभागातील मौजे आक्षी येते. रायगड जिल्हयाच्या पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस पश्चिम घाटाने नटलेला हा परिसर असून मुबंई व पुणे महानगराजवळ आहे. जिल्यात अनेक ऐतिहासिक गडकिल्ले, निसर्ग सौंदर्य व दळणवळण इत्यादी दृष्टीने पर्यटन स्थळांचा विकास करणे गरजेचे आहे..<br>सदर आराखडयात प्रसाधनगृह फॅब्रीकेटेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, निसर्ग पाऊलवाटा, माहिती केंद्र, चेनलिंग फेन्सींग, माहितीफलक, प्रीफॅब्रीकेटेड हट, विदयुतीकरण / सोलर युनिट, चेजींग रुम, बेचेंस व मातिची भांडी खरेदी इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. | घेण्याच्या अटीवर प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| १६.४.५ | निसर्ग पर्यटन केंद्र नाणेघाट भाग १ व २, वनपरिक्षेत्र टोकावडे दक्षिण, तालुका मुरबाड, जि. ठाणे - मुवसं (प्रा) ठाणे | उपवनसंरक्षक, ठाणे यांनी निसर्ग पर्यटन केंद्र नाणेघाट करीता सन २०१६-१७ या १ वर्षाकरीता रु.१४७.८३ लक्षचा आराखडा या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.<br>ठाणे वन विभागास मुंबई, ठाणे, वसई-विरार, कल्याण, उल्हासनगर व इतर महानगरांचे अतिघनतेचे Cosmopolitan क्षेत्र लाभले असून देशाच्या या आर्थिक राजधानी शिवाय पश्चिमेकडे अरबी समुद्राची किनारपटटी व पुर्वेकडे पश्चिम घाटातील सहयाद्री पर्वतमालेचा नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न निसर्ग लाभलेला आहे. पश्चिमेकडील अतिप्रगत भागासह पुर्वेकडील अतिदुर्गम, डोंगराळ व आदिवासी भागाचे क्षेत्र वन विभागात आहे. या प्रगत भागांचा मागासलेला भागाकडे आक्र षण निर्माण करुन मागासलेल्या भागाचे उन्नती कामी उत्प्रेरक होऊन वनांचे संवर्धन साधण्यासह आदिवासी बांधवांचे सक्षमीकरणाद्वारे निसर्ग पर्यटनाच्या माध्यमाने उददीष्ट साध्य करण्याचा व नाणेघाट सारख्या आतापर्यंत दूर्लक्षित राहिलेले पर्यटन स्थळ विकसित करण्याचा प्रयत्न आहे. नाणेघाटात निसर्ग पर्यटक व गिर्यारोहक यांचा वावर असल्याने संपूर्ण नाणेघाट विकसित होणे अपेक्षित आहे. या माध्यमातून स्थानिकांना काही प्रमाणात रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न आहे त्यामुळे त्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होणार आहे.<br>सदर आराखडयात संरक्षण भिंतींची दुरुस्ती | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करणे, झाडांना पार तयार करणे, स्वागत कक्ष उभारणे, कुपंन तयार करणे, पुरातन विहीर व पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती करणे, बेचेंस बसविणे व बालोदयान साहित्य खरेदी करणे, दर्शक स्थळे विकसित करणे, निसर्ग पायवाट तयार करणे, बांबू पॅगोडा तयायर करणे, माहिती फलक तयार करणे, पर्यटकांसाठी साधनसामुग्री खरेदी करणे, सौर पथदिवे लावणे इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. | |
| १६.४.६ | आजोबा निसर्ग पर्यटन केंद्र शहापूर वन विभाग, शहापूर - मुवसं (प्रा) ठाणे | उपवनसंरक्षक, शहापूर यांनी सन २०१६-१७ करिता राज्य योजना निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेतंर्गत रु.३५.९६ लक्ष आराखडा या कार्यालयास सादर केलेला आहे.<br>ठाणे जिल्हयातील शहापूर वन विभागातील डोळखांब वनक्षेत्रातील डेहने गावात आजोबा देवस्थान असून तेथील परिसर निसर्ग पर्यटन संपन्नतेने नटलेला आहे. सहयाद्री पर्वतांच्या रांगा, मुंबईला पाणी पुरवठा करणारे ४ मोठे जलाशय, मानस मंदिर, गंगा देवस्थान अशी पवित्र देवस्थाने असलेले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेला माहुली किल्ला, भातसा, तानसा, शाही व काळू अशा वाहणा-या नदया, राष्ट्रीय महामार्ग क्र.३ व मध्य रेल्वे या तालुक्यातून जात असून निसर्गरम्य तालुक्यामध्ये अनेक पर्यटन स्थळे असून त्यातील आजोबा निसर्ग पर्यटन केंद्र हे एक पर्यटन स्थळ आहे. त्याचे जवळच मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा आहे. डेहने संयुक्त वन व्यवस्थापन समिती मार्फत सदर पर्यटन स्थळ विकसित करण्यात येणार आहे.<br>सदर आराखडयात नेचर ट्रेल, पक्षी निरक्षण मनोरा, प्री-फॅब्रीकेटेड पॅगोडा, स्टोन स्टेप्स, संरक्षक कठडा, पर्यावरणपूरक बेचेंस खरेदी, स्नानगृह, मुतारी या करिता साहित्य सामुग्री खरेदी, टॉवेल, पडदे खरेदी, खिडकीचे पडदे, धर्मशाळा ते सितेचा पाळणा दगडी पाय-या, सितेचा पाळणा स्टेप्स, सितेचा पाळणा कठडा इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. | उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता मागणी करण्यात आलेला निधी DPDC करुन उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| १६.४.७ | अशोका धबधबा, विहीगांव वनपरिक्षेत्र, शहापूर वन विभाग, शहापूर - मुवसं (प्रा) ठाणे | महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक २०.०२.२००८ चे पर्यटन धोरणाप्रमाणे गडकिल्ले व निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करणे, पर्यावरणाबाबत जनजागृती करणे, स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना सहभागी करुन त्यांचे जीवनमान उंचावणे, रोजगार उपलब्ध करुन देणे इत्यादी उदिदष्ट ठेवण्यात आली असून संयुक्त वन व्यवस्थापन समिती विहीगांव यांचे | प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मार्फत अशोका धबधब्याचे पर्यटन विषयक नियोजन व व्यवस्थापन करण्यात येत असून माहे ऑगष्ट २०१४ पासून जुलै, २०१६ पर्यंत रु.१.१० लक्ष चा महसूल प्राप्त झालेला असून भविष्यात त्यामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होण्याची शक्यता आहे. उपवनसंरक्षक, शहापूर यांनी सन २०१६-१७ करिता जिल्हा स्तरावरील निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास या योजनेतंर्गत आराखडा तयार केलेला असून रु.३२.८० लक्ष चा आराखडा सादर करण्यात आला आहे.<br>ठाणे जिल्हयातील शहापूर तालुका हा आदिवासी तालुका असून निसर्ग पर्यटन संपन्नतेने नटलेला आहे. सहयाद्री पर्वतांच्या रांगा, मुंबईला पाणी पुरवठा करणारे ४ मोठे जलाशय, मानस मंदिर, गंगा देवस्थान, आजोबा पर्वत अशी पवित्र देवस्थाने असलेले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेला माहुली किल्ला, भातसा, तानसा, शाही व काळू अशा वाहणा-या नदया, राष्ट्रीय महामार्ग क्र.३ व मध्य रेल्वे या तालुक्यातून जात असून निसर्गरम्य तालुक्यामध्ये अनेक पर्यटन स्थळे असून त्यातील विहीगांव येथील अशोका धबधबा हे एक पर्यटन स्थळ आहे. त्याचे जवळच बळवंतगड हा पुरातन किल्ला आहे. अशोका धबधबा विहीगांव गावाच्या हददीतील वन विभागाचे राखीव वन कंपार्टमेंट नं.५९६ मध्ये येत असून तेथे अनेक चित्रपटांचे चित्रीकरण करण्यात आलेले आहे. त्यापैकी अशोका या चित्रपटाचे चित्रीकरण या धबधब्यावर झाल्याने त्याचे नांव अशोका धबधबा ठेवण्यात आले आहे. अशोका धबधबा येथे जाणेसाठी मध्य रेल्वेवरील कसारा हे रेल्वे स्थान आहे. तेथून १० किमी अंतरावर विहीगांव मोखाडा रोड राष्ट्रीय महामार्ग क्र.३ जव्हार फाटा ते विहीगांव ३ किमी अंतर आहे.<br>सदर आराखडयामध्ये १७० मीटर तीव्र उताराचे भागात घडीव दगडांच्या पाय-या, धोकादायक ठिकाणी व पाय-याचे ठिकाणी एका बाजूस लोखंडी रिलींग करणे, धबधब्याचे ठिकाणी प्लॅटफार्म तयार करणे, लोखंडी पूल तयार करणे, संरक्षक जाळी लावणे, ३ चेजींग रुम, मुख्य रस्त्यापासून धबधब्यापर्यंत अप्रोच रोड तयार करणे, सूचना फलक व प्रसिध्दी फलक, पोलीस चौकी उभारणे, प्रवेशशुल्क नाका उभारणे, लहान मुलांसाठी लाईफ जॅकेट व कचराकुंडी इत्यादी कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर प्रकल्प संयुक्त वनव्यवस्थापन समिती, शहापूर मार्फत राबविण्यात येणार आहे. उक्त स्थळास सन २०१४-१५ चे पावसाळयात जवळपास १ लक्ष पर्यटकांनी भेट दिलेली असून, चालू वर्षापासून रु.१०/- फी आकारण्यात येत आहे. सदर परिसरात गावक-यांनी पार्कींग ची व्यवस्था सुरु केल्याने रु.६०,०००/- चे उत्पादन प्राप्त तसेच चालू वर्षी रु.२.०० लक्ष ची सफाई योजना सुरु करण्यात येणार आहे. जुन ते सप्टेंबर महिन्यात धबधब्यास भेट देणा-या पर्यटकांची संख्या जास्त असते. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) नागपूर यांनी सदर धबधब्याचा आंनद पर्यटकांना जासतीत जास्त दिवस घेतला येईल यासाठी विभागाने / समितीने प्रयत्न करावा असे सुचविले. | |
| १६.४.८ | वर्धम फॉसिल पार्क, सिरोंचा वन विभाग, सिरोंचा - मुवसं (प्रा) गडचिरोली | मुख्य वनसंरक्षक (प्रा) गडचिरचोली यांनी सन २०१६-१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता राज्य योजना निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेतंर्गत आराखडा तयार केलेला असून रु.८३.७५ लक्ष चा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, सिरोंचा यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>वर्धन फॉसिल पार्क हे स्थळ सिरोंचा वन विभागातील सिरोंचा वनक्षेत्रातंर्गत येणा-या वडाधाम या गावालगत असून जवळच राष्ट्रीय महामार्ग क्र.१६ निझामाबाद व जगदलपूर आहे. सदर पर्यटन स्थळ जैवविविधता उदयान म्हणून घोषित करण्यात येणार आहे. भामरागड येथे डॉ. प्रकाश आमटे यांचा लोकबिरादरी प्रकल्प असून तेथे देशी व आंतरराष्ट्रीय पर्यटक भेट देत असतात. तसेच जवळुन वाहत असलेल्या गोदावरी नदीच्या तिरावर कालेश्वर मंदीर अस्तित्वात असून तेलंगाला राज्यातील यात्रेकरु या ठिकाणी भेट देत असतात. आजुबाजूच्या स्थळांमुळे सदर पर्यटन स्थळ विकसित होण्याचा मार्ग सुकर होणार आहे. सदर पर्यटन स्थळाचा विकास संयुक्त वन व्यवस्थापन समिती व एसएचजी यांचे संयुक्त विदयमाने विकसित करण्यात येणार आहे.<br>सदर स्थळ विकसित करण्याकरीता Fossil education centre, Fossil replica (LS), Overhead water tank & pipeline, water stand, road repair and culvert, retaining wall, borewell solar powered, signage and information board, plantation of local species, toilet & bathroom, | प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | solar light, cleaning of fossil area (LS), Watch and ward (chaukidar), Honorarium and travel allowance to paleologist, repair of ticket collection centre, publicity / awareness (brouchure, website, reading material etc.) इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.<br>उक्त विकसित करण्यात येणा-या पर्यटन स्थळास सध्यास्थितीत दररोज ३०-४० पर्यटक व जवळुन वाहत असलेल्या गोदावरी नदीच्या तिरावर कालेश्वर मंदीर अस्तित्वात तेथे दरवर्षी यात्रा भरत असून ४० ते ५० हजार पर्यटक लोक भेट देतात. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. चिंचमलातपूरे यांनी सुचविले की, उक्त फॉसिल स्थळ हे महाराष्ट्रातील एकमेव स्थळ असून त्याचा प्रचार व प्रसार करणेकरीता एक publicity plan तयार करावा. | |
| १६.४.९ | वन उदयान व निसर्ग माहिती केंद्र, वन विभाग, चिपळुन, जि. रत्नागिरी - मुवसं (प्रा) कोल्हापूर | मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांनी सन २०१६-१७ ते २०१७-१८ या कालावधीकरीता राज्य योजना निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेतंर्गत रु.१६०.०० लक्ष चा आराखडा सादर केलेला आहे. सदर पर्यटन स्थळ रत्नागिरी जिल्हयात असून महाराष्ट्राच्या पश्चिम किना-यावर आहे. जिल्हयाचे पश्चिमेस अरबी समुद्र असून पुर्वेस सहयाद्री पर्वताच्या रांगा आहेत. जिल्हयाला सुमारे १६७ कि.मी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. जिल्हयाच्या ५१ टक्के भुभाग वृक्षाच्छादित असून सहयाद्री पर्वत रांगामध्ये वनस्पतीच्या असंख्य प्रजाती आहेत. यामध्ये विविध औषधी वनस्पती आहेत. वन्यजीवांच्या अनेक प्रजाती आहेत. उदा. गवा, बिबट, भेकर, निलगाय, खवले मांजर, रानडुक्कर, ससा, मोर इत्यादी वन्यप्राणी आहेत. जिल्हयालगतचे समुद्रात देवमासा व डॉल्फीन हे सागरी सस्तन प्राणी आढळतात. या सर्व वन्यजीव व जैवविविधतेची माहिती जिल्हयातील नागरीक व विदयार्थ्यांना होवून त्यांच्या मध्ये निसर्ग पर्यावरण वन वन्यजीव संरक्षणाची व संवर्धनाची जाणीव जागृती होण्याचे दृष्टीने परिपूर्ण निसर्ग माहिती केंद्रस्थापित होणे आवश्यक आहे. हयासाठी ०२० हेक्टर क्षेत्र उपलब्ध आहेत. सदर निसर्ग पर्यटन क्षेत्र चिपळून सर्वे क्र.१३५/१ अ-२ मधील ०.७२ हे. क्षेत्रावर विकसित करण्यात येणार आहे.<br>सदर स्थळ विकसित करण्याकरीता कुंपण भिंत बांधणे, दोन मजली इमारत बांधणे, फर्निचर खरेदी, | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | माहिती फलक, वनउदयान निर्मिती, निसर्ग पायवाट, वन्यप्राण्यांचे नमुने, विदयुत व्यवस्था व आराखदयात नमूद केलेली इतर विविध कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.<br>माहिती फलक, निसर्ग माहिती केंद्र व दोन मजली इमारत बांधणे, रोपांची लागवड करणे, उंच रोपांचा पुरवठा करणे इत्यादी कामे सामाजिक वनीकरण विभागाच्या जैवविविधता उदयान किंवा स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उदयान योजनांमधून त्यांना विश्वासात घेवून राबविण्यात यावीत व इतर कामांकरीता निधी राज्य योजनेतंर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल असे समितीने सुचविले. उक्त कामे कॅम्पाचे योजनांमधून राबविणेबाबत चर्चा झाली परंतु अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) नागपूर यांनी सुचविले की, सदर नागरी उदयान राबविण्यात येणारे क्षेत्र हे २० हेक्टर पेक्षा कमी असल्यामुळे कॅम्पा तून निधी उपलब्ध करुन देता येणार नाही. उक्त कामे करतांना वन संवर्धन अधिनियम, १९२७ चा भंग होणार नाही या दक्षता घेण्यात यावी. | |
| १६.४.१० | पुणे वनक्षेत्रातील परीमंडळ लोणीकाळभोर अंतर्गत नियतक्षेत्र दिघी, खराडी स.नं.७४, - मुवसं (प्रा) पुणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता रु.१८.०७ लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>पुणे वनविभागातील पुणे या वनपरिक्षेत्रातील बहुतांश भाग हा अवर्षन प्रवण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. या भागात निसर्गतः आढळणारी वने ही नगण्य स्वरुपाची आहे व त्यामुळे या क्षेत्रात ग्लेरीसिडीया, सुबाभुळ, अकेशिया, निम, शिरस, शिशु, शिसव, खैर, आवळा, निलगिरी व चिंच अशा वनस्पतींची वने निर्माण झाली आहेत. पुणे वनक्षेत्रातील परीमंडळ लोणीकाळभोर अंतर्गत नियतक्षेत्र दिघी मधील खराडी स.नं.७४ मधील ३.४२ हे. वनक्षेत्र परिसरात निसर्ग पर्यटनास चालना देण्याकरीता राबविण्यात येणार असून सदर स्थळ विकसित करण्याच्या दृष्टीने विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करणे, उंच रोपांचा पुरवठा करणे, माहिती फलक उभारणे, जमीन सपाटीकरण करणे, टेरेसिंग करणे व सुशोभिकरण करणे इत्यादी कामे प्रस्तावित आहे.<br>सदर पर्यटन स्थळ वनेत्तर क्षेत्रात येते त्यामुळे | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास राज्य योजना (२४०६-२२९५) या व्यतिरिक्त इतर पर्यटन संबंधित योजनांचे लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करता येईल किंवा सामाजिक वनीकरण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या वृक्षलागवड व इतर योजनांमधून पैसा उपलब्ध करुन देण्याबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात येवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या सूचना समितीने दिल्यात. | |
| १६.४.११ | पुणे वनक्षेत्रातील परीमंडळ लोणीकाळभोर अंतर्गत नियतक्षेत्र दिघी, वडगांव शेरी स.नं.५७ - मुवसं (प्रा) पुणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता रु.१७.९७ लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>पुणे वनविभागातील पुणे या वनपरिक्षेत्रातील बहुतांश भाग हा अवर्षन प्रवण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. या भागात निसर्गतः आढळणारी वने ही नगण्य स्वरुपाची आहे व त्यामुळे या क्षेत्रात ग्लेरीसिडीया, सुबाभुळ, अकेशिया, निम, शिरस, शिशु, शिसव, खैर, आवळा, निलगिरी व चिंच अशा वनस्पतींची वने निर्माण झाली आहेत. वाढत्या शहरीकरणच्या रेटयात प्रदुषणाची पातळी वाढत असून लोकांना शहरात शुध्द हवा उपलब्ध होणे कठीण झाले आहे. त्याची सदर नागरी वनोदयाने फुफुसाचे काम बजावणार आहे व पर्यावरण संतुलनात मदत करणारी आहे. पुणे वनक्षेत्रातील परीमंडळ लोणीकाळभोर अंतर्गत नियतक्षेत्र दिघी मधील खराडी स.नं.५७ मधील २.१३ हे. वनक्षेत्र ता. हवेली, जि. पुणे परिसरात निसर्ग पर्यटनास चालना देण्याकरीता नागरी वनउदयान केंद्र राबविण्यात येणार असून, सदर स्थळ विकसित करण्याच्या दृष्टीने विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करणे, उंच रोपांचा पुरवठा करणे, माहिती फलक उभारणे, जमीन सपाटीकरण करणे, टेरेसिंग करणे व सुशोभिकरण करणे इत्यादी कामे प्रस्तावित आहे.<br>सदर पर्यटन स्थळ वनेत्तर क्षेत्रात येते त्यामुळे निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास राज्य योजना (२४०६-२२९५) या व्यतिरिक्त इतर पर्यटन संबंधित योजनांचे लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करता येईल किंवा सामाजिक वनीकरण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या वृक्षलागवड व इतर योजनांमधून पैसा उपलब्ध करुन देण्याबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | येवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी SFD मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या सूचना समितीने दिल्यात. | |
| १६.४.१२ | भिमाशंकर अभयारण्य - २ अंतर्गत येणा-या मुरबाड तालुक्यातील सिध्दगड निसर्ग पर्यटन आराखडा | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक ३.१२.२०१६ अन्वये सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाचे कालावधीकरीता रु.१८३.५० लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>भिमाशंकर अभयारण्यातील सिध्दगड ता. मुरबाड येथे सिध्दगड असून मुंबई - ठाणे - कल्याण परिसरातील पर्यटकांचे आवडीचे ठिकाण, स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, सहयाद्री पर्वत रांगातील सिध्दगड, गोरखगड, मच्छिंद्रगड येथे नाशिक - ठाणे - मुंबई येथील भाविक व पर्यटकांची वर्दळ असते. नैसर्गिक जंगल, मनमोहक निसर्ग पायवाटा, डोंगर माथे, द-या, धबधबे इ. पर्यटकांसाठी आकर्षण असते. उक्त परिसरात एक पायथा आदिवासी पाडा,जांभुर्डे तलाव, जुने तंबुवटे, हुतात्मा स्तंभ व धबधबा, वीर भाई कोतवाल व हिराजी गोमाजी पाटील स्मृतीस्तंभ व धबधबा परिसर, समाज मंदीर अस्तित्वात आहे. सिध्दगड परिसरात नारीवली या गावात ग्राम परिस्थितीकीय विकास समिती कार्यरत आहे. ग्राम परिस्थितीकीय विकास समिती दुर्गम भागातील असल्याने होमस्टे बाबत मापदंड व मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही होवू शकत नसल्याचे सादरीकरणात म्हटले आहे. पर्यटक निवास व तंबु ओटा बांधकाम इ. सुविधा plinth (ओटाबांधकाम) वरच करण्यात येणार आहे. बोटींग साठी जांभुर्डे तलावात वर्षभर पाणी उपलब्ध असते. त्यासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण देवून सहभागी करण्यात येणार आहे.<br>सदर आराखडयात railings, solar lights, watch tower, soil and moisture conservation for nature trail, Bhai Kotwall Smarak, Shed, Barricate, Security Cabin, Community Centre, Boating, Jambhurde Check Naka & Rest Area, Hutatma Sthambh, Maintenance of old jungle road, cement nala bunds, repairs of nature trail, sitting benches, dust bins, toilet, brochures, boards booklets इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा जिल्हा योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधुन निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आलीत.<br>उक्त जमीन पाटबंधारे विभागाच्या मालकीची असून वन विभागाने जमीनीचा ताबा घेतलेला आहे. | |
| १६.४.१३ | भिमाशंकर अभयारण्य - २ अंतर्गत येणा-या मुरबाड तालुक्यातील अहुपे निसर्ग पर्यटन आराखडा | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक ३.१२.२०१६ अन्वये सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाचे कालावधीकरीता रु.२०४.१५ लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>भिमाशंकर अभयारण्यातील सिध्दगड ता. मुरबाड येथे अहुपे निसर्ग पर्यटन स्थळ असून मुंबई - ठाणे - कल्याण परिसरातील पर्यटकांचे आवडीचे ठिकाण, स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, सहयाद्री पर्वत रांगातील सिध्दगड, गोरखगड, मच्छिद्रगड येथे नाशिक - ठाणे - मुंबई येथील भाविक व पर्यटकांची वर्दळ असते. नैसर्गिक जंगल, मनमोहक निसर्ग पायवाटा, डोंगर माथे, द-या, धबधबे इ. पर्यटकांसाठी आकर्षण असते. उक्त परिसरात एक पायथा आदिवासी पाडा,जांभुर्डे तलाव, जुने तंबुवटे, हुतात्मा स्तंभ व धबधबा, वीर भाई कोतवाल व हिराजी गोमाजी पाटील स्मृतीस्तंभ व धबधबा परिसर, समाज मंदीर अस्तित्वात आहे. सदर पर्यटन स्थळ वन व्यवस्थापन समिती अहुपे च्या माध्यमातून विकसित करण्यात येणार आहे.<br>सदर आराखडयात railings, pagoda, sacred groove, repairs to temple shed, creation of chain link fencing around tent houses, paving paths, beautification of tourist spot waghmal, canteen, solar light, check dam, Construction of LBS and check dams, nature trails, Construction of lat./bath unit, water storage tank, eco shop, creation of tree houses, publicity, dustbins इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलीत.<br>उक्त जमीन पाटबंधारे विभागाच्या मालकीची असून वन विभागाने जमीनीचा ताबा घेतलेला आहे. | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC किंवा जिल्हा योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधुन निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |
| १६.४.१४ | सोनाळे इको टुरिझम पडघा, - मुवसं (प्रा) ठाणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे यांनी त्यांचे पत्र दिनांक २.१२.२०१६ अन्वये सन २०१६-१७ या १ वर्ष कालावधीकरीता रु.१०८.५१ लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर केलेला आहे. आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, ठाणे यांनी सादरीकरण | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेले आहे.<br>सदर आराखडयात Construction of side gutter for road, rubble pitching, maintenance and repairs of the existing trails, guard stones, information sign board, eco toilet with bio digesters, solar lightings, training and capacity building, soil & moisture, bamboo product, benches, solar street lights, dust bins, garden children plays, disiltation of vantalao, security cabins, erecting Kaman, बांबु पॅगोडा तयार करणे, इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलीत. | वा जिल्हा योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधुन किंवा इतर स्त्रोतामधुन निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |
| १६.४.१५ | अमलनाला पर्यटन स्थळाचा विकास करणे - उपवनसंरक्षक मध्य चांदा वन विभाग, चंद्रपूर | उपवनसंरक्षक मध्य चांदा वन विभाग, चंद्रपूर यांनी सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्ष कालावधीकरीता रु.२६९.८९ लक्षचा आराखडा व प्रस्ताव सादर व सादरीकरण देखील केलेले आहे.<br>सदर आराखडयात प्रसाधनगृहाचे बांधकाम करणे, गोडावुन, संरक्षित भिंत व गेट, पाथवेज बडींगसहीत, थीम रेस्टारंट, अभयागत कक्ष, आदिवासी कला केंद्र, लाकडी कुटी, signages, वृक्ष रोपवन, म्युझियम व लायब्ररी, कर्मचा-यांचे निवासस्थान बांधणे, लॉन व लॅन्डस्केट बांधणे इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. | प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून उक्त पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी DPDC वा जिल्हा योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधुन किंवा इतर स्त्रोतामधुन निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटीवर समितीने आराखडयास मंजूरी दिलेली आहे. |

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठकीचा समारोप करण्यात आला.

**परिशिष्ट-१**

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीची तृतीय बैठक, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी उपस्थित सदस्य.**

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री. सर्जन भगत, भा.व.से. | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २. | श्री.श्रीभगवान, भा.व.से., | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३. | श्री.बि.एस.के.रेडडी, भा.व.से, | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ४. | डॉ.एस.एच.पाटील, भावसे | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) नागपूर |
| ६. | डॉ.एन.रामबाबू, भावसे | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर |
| ७. | प्रो.निशीकांत मुखर्जी | सदस्य | सदस्य, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| ८. | श्री. संजय करकरे | सदस्य | सदस्य, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| ९. | श्रीनिधी नांदेडकर ॲण्ड असोसिएटस, नागपूर | सदस्य | सदस्य, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| १०. | श्री.दिलीप रा.चिंचमलातपूरे | सदस्य | सदस्य, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,, नागपूर |